लोकसत्ता पु-पा-१.

# मेट्रोच्या कारशेडबाबत केवळ तोंडी निर्णय?

## लेखी आदेशाअभावी ग्रामस्थांमध्ये संभ्रम

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** राई-मोरवा येथे प्रस्तावित करण्यात आलेले मेट्रो कारशेड पुढे उत्तन येथे हलवण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. त्यानंतर मेट्रो मार्गिकाही उत्तनपर्यंत नेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे; परंतु या घोषणा करून सहा महिने उलटूनही याबाबतचे कोणतेही लेखी आदेश मिळत नसल्यामुळे कारशेडला विरोध करणाऱ्या ग्रामस्थांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

मीरा-भाईंदर मेट्रो मार्गिका-९ चे काम हे मागील साडेतीन वर्षांपासून प्रगतिपथावर सुरू आहे. या मेट्रो मार्गिकेसाठी आवश्यक असलेल्या कारशेडची जागा भाईंदर पश्चिमेतील राई-मोरवा गावालगत ८७ एकरांत एमएमआरडीएने निश्चित केली होती; परंतु तेथील ग्रामस्थांच्या विरोधामुळे हे कारशेड उत्तन येथे स्थलांतरित करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी २० डिसेंबर रोजी हिवाळी अधिवेशनावेळी केली. त्यामुळे ग्रामस्थांचा विरोध शांत झाला होता. दरम्यान, २७ फेब्रुवारी रोजी उत्तनच्या खोपरा गावात असलेल्या सर्व्हे क्रमांक १९ या जागेवर ठाण्यातील भूमी अभिलेख विभागाने शासकीय जमिनीच्या सर्वेक्षणाचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे हे सर्वेक्षण मेट्रो कारशेडसाठीच होत असल्याचा संशय ग्रामस्थांमध्ये निर्माण झाला आहे.

त्यात २२ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्री फडणवीस हे मीरा-भाईंदरमध्ये आले **(पान ३ वर)**

### भाजपकडून फसवण्याचा प्रयत्न?

- उत्तन येथील प्रस्तावित रस्ता ३० मीटर रुंद करण्याचा ठराव २०१८ मध्ये मंजूर झाला आहे. याच मार्गावरून मेट्रोची मार्गिका उत्तन येथे नेली जाणार आहे; परंतु रस्त्याच्या या रुंदीकरणामुळे या मार्गावरील राई-मोरवा गावातील ५४७ घरे बाधित होणार असल्यामुळे ग्रामस्थांनी विरोध केला होता. मध्यंतरी हे काम रद्द करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला होता. हा रस्ता ३० मीटर रुंद करून नये, असा ठराव महासभेत मंजूर केला आहे.
- आता भाजपच्याच वरिष्ठ नेत्यांनी काम जलदगतीने करून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे भाजपकडून आमची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला जात असला तरी कारशेड आणि मेट्रो मार्गिकेला विरोध कायम करणार असल्याचे भूमिपुत्र सामाजिक समन्वय संस्थेचे अध्यक्ष अशोक पाटील यांनी दिली.

# नळजोडण्यांतून पंपाद्वारे पाणीउपसा केल्यास कारवाई

## वसई-विरार महापालिकेचा इशारा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार शहरात पाणीटंचाई जाणवत असताना काही नागरिक नळजोडण्यांना विद्युत पंप लावून बेकायदा पाणीउपसा करीत आहेत. याचा परिणाम पाणी वितरण व्यवस्थेवर होऊ लागला आहे. त्यामुळे बेकायदा पाणीउपसा केल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा पालिकेने दिला आहे.

वसई-विरार शहरात सूर्या, उसगाव व पेल्हार या तिन्ही धरणांतून प्रतिदिन २३० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सध्या शहरात ५९ हजारांहून अधिक नळजोडण्या आहेत. मात्र, आता उन्हाळ्याचे दिवस सुरू झाल्याने पुन्हा शहरात पाण्याची समस्या भेडसावत आहे. अनेक ठिकाणी आता विभागानुसार पाणीपुरवठा करण्यासाठी नियोजन केले आहे. आधीच उपलब्ध असलेले पाणी अपुरे आहे. त्यातच काही नळजोडणीधारक नळाला विद्युत पंप (मोटार) लावून बेकायदा पाणीउपसा करत आहेत. त्यामुळे इतर नळजोडणीधारकांना पाणी मिळण्यास अडचणी येत आहेत. कमी दाबाने पाणीपुरवठा तसेच पाणीच मिळत नसल्याच्या तक्रारी पालिकेकडे येऊ लागल्या आहेत. अखेर पालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत विद्युत पंपाद्वारे केला जाणारा बेकायदा पाणीउपसा त्वरित थांबवावा, असे आवाहन पवार यांनी केले आहे.

### 'विशेष मोहीम राबवणार'

महापालिकेच्या आवाहनानंतरही जे नागरिक विद्युत पंपाद्वारे पाणी उपसा थांबवणार नाहीत, अशांविरोधात विशेष मोहीम हाती घेतली जाणार आहे. या कारवाईदरम्यान आढळून येणारे वीजपंप जप्त करून संबंधित नळजोडणी तत्काळ खंडित केली जाईल, असा इशारा महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी दिला आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु-५-१.

# 'पीओपी' मूर्तींवर बंदी

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी महापालिकेचा निर्णय

**सुहास बिन्हाडे, लोकसत्ता**

**वसई :** महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या नियमानुसार वसई, विरार शहरांत प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींना महापालिकेने बंदी घातली आहे.त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात येणार आहे. दरम्यान, या संदर्भात राज्य शासनाने कुठलेही धोरण लागू केले नसल्याने वसई, विरारमधील मूर्तिकार संभ्रमात आहेत. बंदी लागू करायची असेल तर सर्वत्र करा, अशी मागणी मूर्तिकार संघटनांनी केली आहे.

वसई-विरार महापालिकेने मागील वर्षी शहरात कृत्रिम तलावांचा यशस्वी प्रयोग राबवला होता. एकूण विसर्जनाच्या ६० टक्के मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात झाले होते. यंदाही पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पालिकेने आतापासूनच सुरुवात केली आहे. त्याचा एक भाग म्हणून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना बंदी घातली आहे. केंद्रीय प्रदूषण नियामक मंडळाने १२ मे २०२० रोजी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने ऑगस्ट २०२२ रोजी परिपत्रक काढून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचा वापर करू नये असे आदेश काढले होते. यासंदर्भात शहरातील मूर्तिकारांची बैठक घेऊन त्यांना या निर्णयाची माहिती देण्यात आली आणि पर्यावरणपूरक मातीच्या मूर्ती बनविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शहरात जरी बंदी असली तरी बाहेरील शहरांतून, जिल्ह्यांतून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्या आणल्या जाऊ नये यासाठी तपासणी नाके (चेक पोस्ट) तयार केले जाणार आहेत, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त (पर्यावरण) सागर घोलप यांनी दिली.

यंदादेखील प्रदूषण टाळण्यासाठी मातीच्या मूर्त्यांच्या वापर करावा याबाबत जनजागृती करणार आहोत, अशी माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी दिली.

वसई, विरारमधील मूर्तिकारांनी मागील वर्षी तयार केलेल्या १० हजार प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तयार आहेत. बंदी घातल्याने या मूर्तिकारांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे या मूर्तिकारांना नुकसानभरपाई मिळावी यासाठी पालिकेने शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे.



### मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेकडे लक्ष?

पेणमधील संघटनांनी नुकतीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन पीओपीच्या मूर्तींवर बंदी आणू नये, अशी मागणी केली. उत्सव दणक्यात साजरे करण्याची भूमिका घेणारे मुख्यमंत्री पर्यावरणपूरक निर्णय घेतील का, याकडे लक्ष लागले आहे.

### मूर्तिकारांपुढे अडचणी

वसई, विरार शहरात ४० हजारांहून अधिक मूर्तींची स्थापना होते. त्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येने मातीच्या मूर्त्या तयार करण्याचे मोठे आव्हान मूर्तिकारांपुढे आहेत. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती झटपट तयार होतात; पण मातीच्या मूर्ती तयार करायला वेळ लागतो. शिवाय त्या दुप्पट महाग असतात, असे मूर्तिकारांनी सांगितले.

### शासनाचे निर्देश नसल्याने मूर्तिकार संभ्रमित

वसई, विरार शहरांत २०० हून अधिक मूर्तिकार आहेत. पालिकेच्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले आहे. मात्र राज्य शासनाने अद्याप यासंदर्भात कुठलाही निर्णय दिलेला नाही. त्यामुळे मातीच्या मूर्ती बनवायच्या की प्लास्टर ऑफ पॅरिसच्या याबाबत संभ्रम आहे. राज्य शासनाने या संदर्भात लवकर निर्णय जाहीर करावा, जेणेकरून कामाला सुरुवात करता येईल, असे विरार-वसई मूर्तिकार संघटनेचे अध्यक्ष जितेश पालकर यांनी सांगितले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घालायची तर ती सरसकट सगळीकडे हवी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

Scanned with CamScanner

पुढारी पा-नं.१.

# सरकारी कर्मचाऱ्यांना कार्यालयात जाताना हेल्मेटसक्ती

## विभागप्रमुखांवर आकारला जाईल दंड; खासगी कार्यालयांनाही सक्ती केली जाणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

अनेकदा जनजागृती करूनही सर्वसामान्य नागरिक हेल्मेट वापरताना दिसत नाहीत. एवढेच नाही तर सरकारी कर्मचारीही हेल्मेट न वापरता दुचाकीवरून कार्यालयात येतात. त्यामुळे परिवहन विभागाने आता सरकारी कर्मचाऱ्यांनी कार्यालयात येताना हेल्मेट घातले नाही तर संबंधित कार्यालयातील विभागप्रमुखांवर दंड आकारला जाईल, असे परिपत्रकच काढले आहे.

परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी राज्यातल्या ५० आरटीओ कार्यालयांना हेल्मेट वापराबाबतच्या मार्गदर्शक सूचना पाठवल्या आहेत. त्यानुसार सर्व कार्यालयांनी मोटार वाहन नियम १५४ सी ची काटेकोर अमंलबजावणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. सरकारी कर्मचाऱ्यांनी कार्यालयात दुचाकीवर येताना हेल्मेट घालणे बंधनकारक आहे. हा नियम पाळणार नाहीत, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई



करण्यात येणार आहे.

सरकारी कार्यालयांनंतर हा नियम खासगी आस्थापनांनाही लागू करण्यात येणार असल्याचेही भिमनवार यांनी सांगितले आहे. या नियमामुळे हेल्मेट वापरणाऱ्यांची संख्या वाढेल आणि दुचाकी वाहनांचा अपघात झाल्यानंतर होणाऱ्या मृत्यूंची संख्या कमी होईल.

गाडी चालवताना सुरक्षा साधने न वापरणाऱ्या नागरिकांना १००० रुपये दंड आणि चालक परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याची सेक्शन १९४ सी मध्ये तरतुद आहे. परंतु, प्रभावी अंमलवजावणी होत नसल्याने हेल्मेट न वापरण्याकडे लोकांचा कल आहे.

**भरारी पथकाद्वारे लक्ष**

यासंदर्भात दै. 'पुढारी'शी बोलताना परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी सांगितले, हेल्मेटचा वापर सरकारी कार्यालयात येताना कर्मचारी करतात की नाही यावर आमच्या भरारी पथकाद्वारे बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे. तसेच सरकारी कार्यालयाच्या पार्किंग लॉटमध्ये असणाऱ्या सीसीटीव्हीचे फुटेज सरप्राईज व्हिजिटमध्ये भरारी पथक तपासेल. त्यानुसार कर्मचारी दुचाकीवरून येताना हेल्मेट घालून आल्याचे दिसले नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधित कर्मचाऱ्याच्या विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल.

### सरकारी कर्मचारी संघटनेची भूमिका

यासंदर्भात बोलताना राज्य मध्यवर्ती सरकारी कर्मचारी संघटनेचे प्रवक्ते सुरेंद सरतापे म्हणाले की, लोकांनी हेल्मेट वापरणे गरजे आहे. त्यासाठी सतत प्रबोधन करण्याच्या मोहिमा परिवहन विभाग आणि पोलिसांनी घ्यायला हव्यात. मात्र फक्त सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर कारवाई केली तर त्यातून एक टक्कयापेक्षाही जास्त हेल्मेट वापरणाऱ्यांची संख्या वाढणार नाही. ही मोहीम राबवली जाणार असली तरी कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी परिवहन विभागाकडे तेवढे कर्मचारी नाहीत. हेल्मेट न वापरणारा कर्मचारी सापडल्यानंतर नोटीस पाठवणे, दंड वसूल करणे, इतर कायदेशीर प्रक्रिया राबवणे यासाठी आवश्यक कर्मचारी नाहीत. त्यामुळे या मोहिमेचा अपेक्षित फायदा होणार नाही.

पुढारी पु-पा-३.

# विरार शहरात वीस तास वीज गायब

## उकाड्याने नागरिक झाले हैराण

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

ऐन उन्हाळ्यात रात्रभर वीजेशिवाय, अंधारात, पंख्याशिवाय राहण्याची वेळ विरार पश्चिमेकडील यशवंत नगरवासीयांवर आली. म्हाडा संकुलातील १६ विंगमधील रहिवासी मंगळवारी रात्री उकाड्याने पुरते हैराण झाले.

या ठिकाणी विरार पश्चिमेचे वीज वितरण उपकेंद्र आहे. तेथे समोरच्या भागात केवल फॉल्ट झाला आणि रात्री ९ वाजताच्या सुमारास परिसराची वीज गायब झाली. याबाबत वेळ उशिरा लाईट सुरु होईल असे येथील अभियंत्यांकडून सांगून वेळ मारुन नेण्यात आली. रात्र कशी-बशी घालवली तरीही दुसऱ्या दिवशी देखील वीज येण्याचे नाव घेईना. काही ठिकाणी दुपारी दोनच्या सुमारास तर काही ठिकाणी सायंकाळी चार वाजता वीज सुरु झाली.

संतप्त रहिवाशांनी यशवंत नगर व म्हाडा कॉलनीतील वीज मंडळ कार्यालयावर मोर्चा नेऊन जाब विचारला. मयुरेश वाघ, बाबू देवडिगा यांनी मोर्चाची संतप्त भूमिका अभियंते सुरेंद्र पिल्लई यांच्यासमोर मांडली. म्हाडामध्ये २४-२६ मजल्याच्या इमारती आहेत. लाईट गेल्यावर लिफ्ट बंद असते. काही घरात आजारी माणसे असतात, लहान मुले असतात, नोकरी करुन उशिरा लोक घरी येतात, काही वर्क फ्रॉम होम करतात, वीज गायब जरी झाली तरी टेक्निकल फॉल्ट शोधून तासाभरात वीज तात्काळ यायला हवी.



मात्र विद्युत मंडळ अलिकडे एक दिवस जरी विजेचे बील उशिरा भरले तर लाईट कापण्याची तात्काळ कारवाई करते मात्र वीस-वीस तास लाईट जाऊनही त्याबद्दल विद्युत मंडळाची कार्यक्षमता का दिसून येत नाही? तांत्रिक अडचणी रहिवाशांना सांगून उलट हे अभियंते सामान्यांना फसवण्याची कामगिरी करतात.

वीज यंत्रणेत काय बिघाड होतो हे सामान्य माणसे प्रत्येकजण अभियंता नसल्याने त्यांना कोठून कळणार? यावेळी जनतेचा उद्रेक होईल अशा इशारा या संतप्त मोर्चाकडून देण्यात आला. वीज जाता कामा नये, तांत्रिक बिघाड झाला तर अर्ध्या तासाच्या आत वीज पुन्हा आली पाहिजे, वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार संत्रस्त नागरीक सहन करणार नाहीत असाही इशारा देण्यात आला.

Scanned with CamScanner

पुढारी पु.५१.३

# विरार-आगाशीतील समस्या प्राधान्याने सोडवा

## नागरिकांचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

आगाशी हे विरार पश्चिमेकडील सर्वाधिक लोकसंख्या असलेले वसई तालुक्यातील मोठे महसुली गाव आहे. या गावाची लोकसंख्या पन्नास हजाराहून अधिक आहे. या गावात इमारती वाढत आहेत. मात्र पाणीपुरवठा, आरोग्यसुविधा, स्वच्छता, रस्ते, बांधकाम व दुरुस्ती, वाहतूककोंडी अशा अनेक समस्या येथील नागरिकांना सतावत आहे. हे प्रश्न सोडवण्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

येथे लोकांच्या थोड्याफार मालकीच्या जमिनी आहेत. या जमिनीवर केलीच तर थोडीफार भातशेती नाहीतर केळीच्या बागा, भाजीपाल्याची पीके घेतली जातात. शिक्षणामुळे शेतकऱ्यांची मुले मुंबई व इतरत्र नोकरीला लागली असून घरात शेती करणारे कोणी नाही. त्यामुळे अनेकदा शेती पडीक राहते. बांधकाम व्यवसायामुळे वीस गुंठ्यापासून एक-दीड एकरपर्यंत जमिनी असणाऱ्यांची शेती करताना खर्चाची व मजूर मिळत नसल्याने शेतांच्या कामाची आबाळ होते. मजूर मिळत नाहीत, खर्च परवडत नाहीत, चार पैसे उत्पन्न कमवायचे तर कधी पावसाळ्यात अनेक अडचणी असतात. तर उन्हाळ्यात अवकाळी पावसाचा ताण असतो, अशा परिस्थितीत झटपट श्रीमंत होण्यासाठी जमिन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात अनेकजण रुची घेतात.

महसूल खात्यातील भ्रष्टाचार, तलाठ्यांची सात-बारा वरील लबाडी यामुळे ज्यांच्या जमिनी आपल्या राहत्या घरापासून दूरवर आहेत त्यांच्या जमिनीत घुसखोरी करुन सात-बारा उताऱ्यावर फेरबदल करुन गरिबांच्या जमिनी हडप करण्याचे उद्योग सुरु असल्याची तक्रार अभिव्यक्ती जनमंचकडे आगाशीतील शेतकऱ्यांनी केली आहे.

गावातील खेळाचे मैदान असो की सधन शेतकऱ्यांच्या किरकोळ जमिनी आडवळणाला जरी असल्या तरी त्या गिळंकृत करण्याचे कारस्थान कुठे ना कुठे केले जाते. वसई तालुक्यात जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत लक्ष घालून अपप्रवृत्तींना व महसूल खात्यातील भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांना रोखावे अशी मागणी एका निवेदनाद्वारे पालघर जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. वसई - विरार परिसरात बेकायदा अतिक्रमणे वाढली आहेत. तसेच पाणीपुरवठा सुरळीत होत नाही. रस्ते विकासाच्या बाबतही अनेक समस्या डोकेवर काढू लागल्या असल्याने सर्वसामान्य वसईकर हैराण झाल्याचे चित्र आहे. वाढत्या उष्म्यामुळे दिवसभर उकाड्याने त्रस्त वसईकरांनी वीज मंडळावर नाराजी व्यक्त केली.

पुढारी पु.५१.१.

# बांगलादेशीवर पोलिसांची कारवाई

**मिरारोड :** नवघर पोलिस ठाणे हद्दीत एक बांगलादेशी नागरिक विनापरवाना वास्तव करत असल्यामुळे पोलिसांनी त्याला अटक केली आहे. भाईंदर पूर्वेला बांगलादेशी नागरिक कंपन्यामध्ये लेबरकाम करून उदरनिर्वाह करत असल्याची माहिती नवघर पोलीस ठाण्यातील दहशतवाद विरोधी कक्षाला मिळाली होती. त्यानुसार पोलिस पथक तयार करून भाईंदर पूर्व बालाजी इस्टेट, गोडदेव नाका परिसरात गस्त घातल असताना एक इसम कंपनीमध्ये लेबरकाम करताना दिसून आला. पोलिसांनी त्या संशयित इसमाकडे चौकशी केली असता तो बांगलादेशी असल्याचे त्याने कबूल केले. तसेच कागदपत्र मागितले असता तो भारतीय असल्याचे कोणतेही कागदपत्र दाखवू शकला नाही. त्यामुळे त्याच्याविरुद्ध नवघर पोलिस ठाण्यात भारतीय पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम १९५० कलम ३ (अ), ६ (अ) सह विदेशी नागरीक अधिनियम १९४६ कलम १४ (अ) व परकिय नागरीक आदेश १९४८ कलम ३ (१ ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच ज्या कंपनी मध्ये तो काम करत होता त्या कंपनी मालकाला देखील नोटीस बजावण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी ५-५-१.

# शहराला पाणी न मिळाल्यास मोर्चा

## स्टेमने पाणी दिले तर एमआयडीसीकडून प्रतिसाद नाहीच

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर शहराला ऐन उन्हाळ्यात कमी पाणीपुरवठा होत असल्याने अनेक भागांमध्ये कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाली आहे. यावर सर्व पक्षीय माजी नगरसेवकांनी आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता. आयुक्तांनी स्टेम प्राधिकरण व एमआयडीसी अधिकाऱ्यांना बुधवारी चर्चेसाठी पाचारण केले. मात्र आयुक्तांच्याच अनुपस्थितीत सायंकाळी ६ वाजता पार पडलेल्या चर्चेत सर्व पक्षीय नगरसेवकांनी स्टेम व एमआयडीसी अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेत गुरुवारपासून शहराला मंजूर कोट्याप्रमाणे पाणीपुरवठा न केल्यास कार्यालयावर मोर्चा काढू, असा इशारा दिला. यानंतर स्टेमने गुरुवारी मंजूर कोट्याप्रमाणे शहराला पाणीपुरवठा केला. तर एमआयडिसीने अद्याप प्रतिसाद न देता पूर्वीप्रमाणेच पाणीपुरवठा सुरु ठेवल्याने लोकप्रतिनिधींनी संताप व्यक्त केला आहे.

शहराला स्टेम प्राधिकरणाकडून ८६ व एमआयडिसीकडून १३५ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा मंजूर करण्यात आला आहे. पण यापैकी स्टेमकडून ७५ ते ८० तर एमआयडिसीकडून १०९ ते ११२ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जात आहे. हा पाणीपुरवठा ऐन उन्हाळ्यात अपुरा ठरत असल्याने शहरात अघोषित पाणी कपात लागू झाल्याने शहरातील काही भागांमध्ये कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाली आहे. गतवर्षी देखील या कंपन्यांनी शहराला अघोषित पाणीकपात लागू केली होती. याविरोधात भाजपने माजी आ. नरेंद्र मेहता यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडल्यानंतर शहराला पुरेसा पाणीपुरवठा सुरु करण्यात आला. यंदा येरे माझ्या मागल्याचा प्रकार पुन्हा सुरु झाला असतानाच शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीतून ठाणे महापालिकेला पाणीपुरवठा केला जात असल्याने पाणी टंचाईत भर पडली आहे.

या कृत्रिम पाणी टंचाईमुळे लोकांच्या मनात तीव्र रोष निर्माण झाला असतानाच सर्व पक्षीय माजी नगरसेवकांनी आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे पत्रव्यवहार करून शहराला मंजूर कोट्याप्रमाणे पाणीपुरवठा होण्यासाठी स्टेम व एमआयडीसी अधिकाऱ्यांना चर्चेसाठी पाचारण करण्याची मागणी केली. आयुक्तांनी त्याची दखल घेत बुधवारी स्टमचे व्यवस्थापकीय संचालक संकेत घरत व एमआयडीसीचे उपअभियंता दस्तगीर बिजली यांना चर्चेसाठी पाचारण केले. यावेळी आयुक्तच अनुपस्थित राहिल्याने सर्वांनी नाराजी व्यक्त करीत अघोषित पाणी कपातीबाबत स्टेम व एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले.

### ठाणे महापालिकेची अवैध जोडणी खंडित करा

**यावेळी स्टेमकडून होत असलेल्या पाणीपुरवठ्यातून ठाणे महापालिकेतील पाटलीपाडा परिसर व बीएसयुपी योजनेतील सदनिकांना पाणीपुरवठा केला जात असल्याचे निदर्शनास आले. यामुळे संतप्त माजी नगरसेवकांनी आमच्या खर्चाने अंथरलेली जलवाहिनी आमच्या ताब्यात द्या, त्यावरील ठाणे महापालिकेची अवैध जोडणी खंडित करण्याची मागणी स्टेमकडे केली. दरम्यान स्टेमकडून पालिकेला आकारण्यात येणारे पाणी बिल अवास्तव असल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी स्टेमने कोलशेत येथे बसविण्यात आलेल्या मीटरच्या रिडींगप्रमाणेच बिल आकारण्यात येत असल्याचे घरत यांनी सांगितले. यावर देखील सर्वांनी आक्षेप घेत शहराची हद्द चेने गावापर्यंत असून तेथे बसविण्यात आलेल्या मीटरच्या रिडींगप्रमाणेच बिल आकारण्याची मागणी घरत यांच्याकडे केली. इतर शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे बिल आम्ही का भरावे, असा सूर लोकप्रतिनिधींनी आळवल्यानंतर घरत यांनी चेने येथील मीटरप्रमाणेच बिल आकारण्याचे मान्य केले.**



### एमआयडीसीच्या असहकार्यावर तीव्र संताप

एमआयडिसीच्या असहकार्यावर लोकप्रतिनिधींनी तीव्र संताप व्यक्त केला असून एमआयडिसीने येत्या शनिवारपर्यंत मंजूर कोट्यापैकी किमान ११५दशलक्ष लीटर पाणीपुरवठा सुरु केला नाही तर त्यांच्या कार्यालयासमोर सर्व पक्षीय नगरसेवक जनआंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. बैठकीत आ. गिता जैन, अतिरीक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अनिकेत मनोरकर, अतिरीक्त शहर अभियंता सुरेश वाकोडे, कार्यकारी अभियंता शरद नाणेगावकर, माजी महापौर ज्योत्स्ना हसनाळे, भाजपचे माजी नगरसेवक प्रशांत दळवी, राकेश शाह, ध्रुवकिशोर पाटील, भगवती शर्मा, काँग्रेसचे जुबेर इनामदार, सेनेचे (शिंदे गट) धनेश पाटील, सेनेच्या (ठाकरे गट) माजी नगरसेविका निलम ढवण, शर्मिला बगाजी, राष्ट्रवादीचे आसिफ शेख आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ २८·११·२२.

# तुंगारेश्वर आश्रमाला मुख्यमंत्र्यांची भेट

## सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन; संस्थेच्या उपक्रमांचे कौतुक

विरार, ता. २७ (बातमीदार) : सिद्ध बालयोगी सदानंद महाराज यांनी समाज सुधारण्यासाठी आणि वनौषधी संगोपनासाठी विशेष कार्य केले आहे. त्यांनी ज्ञानेश्वरी देश-विदेशांतही पोहोचविली. त्यांच्या संस्थेला आवश्यक सर्व सुविधा पुरवण्याबाबत सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिले. वसईतील तुंगारेश्वर येथील बालयोगी श्री सदानंद महाराज आश्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एका धार्मिक कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री शिंदे हे तुंगारेश्वर येथे आले होते.

कोरोना काळात बालयोगी सदानंद महाराज संस्थेने परिसरातील लोकांसाठी उत्तम कार्य केले आहे. सर्वसामान्यांच्या दुःखात धावून जाणे ही परंपरा त्यांनी जोपासली. चांगल्या गोष्टींसाठी बाबांनी आशीर्वाद दिले आहेत. आमचे सरकार देखील सर्वसामान्यांचे सरकार आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी जे जे निर्णय घेणे आवश्यक आहेत ते आम्ही आतापर्यंत घेतले आहेत. भविष्यातही आवश्यक ते निर्णय घेतले जातील. बाबांचे हे कार्य निरंतर चालू राहणार, अशी अपेक्षा मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.

मी या आश्रमामध्ये आनंद दिघे साहेबांसोबत येत होतो. ही आठवण आज मुद्दाम मला सांगाविशी वाटते. आश्रम संस्थेकडून भविष्यातही आध्यात्मिक मानवी उन्नतीसाठी आवश्यक असणारे कार्य व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. यावेळी बालयोगी सदानंद महाराज, खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा, राजेश पाटील, शांताराम मोरे, जिल्हाधिकारी गोविंद बोडके वसई-विरार महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार, ठाणे जिल्ह बँकेचे अध्यक्ष राजन पाटील आर मान्यवर उपस्थित होते.



वसई : बालयोगी श्री सदानंद महाराज आश्रम समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट दिली.

सकाळ २८-४-२३.

# जळीतकांड चौकशी अहवालाची प्रतीक्षा

विरार, ता. २७ (बातमीदार) : विरारच्या विजयवल्लभ रुग्णालयाला लागलेल्या भीषण आगीला रविवारी (ता. २३) दोन वर्षे पूर्ण झाली. या दुर्घटनेचा चौकशी अहवाल दोन वर्षांपासून गोपनीय ठेवण्यात आला आहे. न्यायालयीन प्रक्रिया संथगतीने सुरू असून रुग्णालयाकडूनही पीडितांच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई मिळालेली नसल्याने पीडितांच्या कुटुंबीयांनी खंत व्यक्त केली आहे.

विरार पश्चिमेला असणाऱ्या विजय वल्लभ रुग्णालयाला २३ एप्रिल २०२१ रोजी पहाटे साडेतीन वाजता आग लागली होती. या रुग्णालयात कोरोनाचे रुग्ण उपचार घेत होते. आगीमुळे अतिदक्षता विभागातील १६ रुग्णांचा होरपळून मृत्यू झाला होता. या जळीतकांडावेळी अग्निशमन दलाच्या फायर ऑडिटवर अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. पालिकेच्या अग्निशमन विभागात सध्या मुख्य अग्निशमन दलप्रमुखाचे पद रिक्त असून या पदावर एकाची नेमणूक झाली होती; परंतु तो अधिकारी हजर न झाल्याने सध्या उपमुख्य अग्निशमन दलप्रमुखाकडे प्रभारी पदभार देण्यात आला आहे. या अधिकाऱ्याच्या काळातच हे जळीतकांड झाले होते.

### माहिती अधिकारालाही केराची टोपली

अग्निशमनच्या कार्यालयात फायर ऑडिटच्या फायली काही बाहेरचे लोक हाताळत असून ते सांगतील, तशा परवानग्या देण्यात येत असल्याचा आरोप या ठिकाणी करण्यात येत आहे. आग दुर्घटनेच्या चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने चौकशी करून अहवाल गोपनीय ठेवण्यात आला आहे. माहिती अधिकारातदेखील तो अहवाल गोपनीय असल्याचे कारण देऊन देण्यात येत नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते चरण भट यांनी सांगितले.

Scanned with CamScanner

सकाळ ५-५-१.

# राष्ट्रीय क्रीडा संकुलाची रखडपट्टी

## वसईतील खेळाडूंची प्रतीक्षा कायम; पाच वर्षांपासून काम संथगतीने

वसई, ता. २७ (बातमीदार) : वसई-विरार महापालिकेच्या माध्यमातून बोळिंज म्हाडा वसाहत आरक्षण क्र. १६२ मध्ये क्रीडा संकुल आणि क्लब हाऊस उभारण्यासाठी नोव्हेंबर २०१७ मध्ये घोषणा करण्यात आली. त्याचे रीतसर भूमिपूजनदेखील झाले. त्यामुळे सराव करण्यासाठी खेळाडूंना चांगले क्रीडासंकुल मिळणार असल्याने वसईमधील खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते, पण गेल्या पाच वर्षांपासून या संकुलाचे काम संथगतीने सुरू असल्याने खेळाडूंसह नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.

वसई-विरार शहरात नागरी वस्ती वाढत आहे. तसेच शहरात मैदानाची कमतरता आहे. त्यामुळे खेळाडूंना सराव करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. अनेक खेळाडू हे सरावासाठी प्रशिक्षक व मैदान शोधत मुंबईकडे धाव घेत असतात. वसई-विरारच्या काही भागांत छोटी-मोठी मैदाने आहेत; मात्र ती मर्यादित असून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना त्याचा फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे महापालिकेच्या क्षेत्रात हे क्रीडा संकुल उभारले जात आहे. विरार पश्चिमेला म्हाडाचे मैदान हे आरक्षण क्रमांक १६२ वर आहे. हे मैदान पालिकेकडे २०१३ मध्ये हस्तांतरित करण्यात आले होते. त्यानंतर येथे क्रीडासंकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. या क्रीडा संकुलाच्या कामाचे २०१७ मध्ये भूमिपूजन करण्यात आले होते, पण अजूनही या क्रीडा संकुलाचे काम पूर्ण झालेले नाही.

मात्र २०१८ रोजीच्या कार्यदेशात १८ महिन्यांत म्हणजेच जुलै २०१९ पर्यंत क्रीडासंकुलाचे काम पूर्ण करण्याची अट घातली गेली होती, आता ही मुदतवाढ डिसेंबर २०२३ पर्यंत देण्यात आली आहे. जवळपास पाच वर्षे काम पूर्ण झाले नाही. वसई तालुका कला क्रीडा व पालिकेतर्फे नऊ प्रभागांतून कला-क्रीडा महोत्सवातून स्पर्धा भरवल्या जातात. त्याचा फायदा खेळाडूंना होत असतो. तालुका, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत नाव उज्ज्वल करत आहेत; मात्र राष्ट्रीय क्रीडा संकुल उभारले गेले तर सरावाची संधी व त्यातून अनेक स्पर्धक तयार होतील. परंतु खेळाडूंना हे क्रीडासंकुल कधी पूर्ण होणार याची प्रतीक्षा करण्याशिवाय पर्याय नाही.



वसई : विरार येथे उभारण्यात येणारे राष्ट्रीय क्रीडासंकुल अपूर्णावस्थेत आहे.

खासदार राजेंद्र गावित व सामाजिक कार्यकर्ते मयूरेश वाघ यांनी महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांची भेट घेऊन क्रीडा संकुलाच्या कामाबाबत माहिती घेतली असताना डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

### असे आहे क्रीडा संकुल

या क्रीडासंकुलात ४०० मीटरचा सिंथेटिक ट्रॅक, टेबल टेनिस, बॉक्सिंग, मार्शल आर्ट, तरणतलाव, बास्केटबॉल, बॅडमिंटन कोर्ट, फुटबॉल, लांब उडी, भालाफेक, थाळीफेक यासह अन्य खेळांचा सराव करता येणार आहे; जेणेकरून त्यांना भविष्यात पुढे जाण्याची संधी मिळणार आहे.

### ठेक्यात १२ टक्क्यांनी वाढ

जानेवारी २०१८ मध्ये या कामाचा ठेका देण्यात आला त्या वेळी ४३ कोटी १० लाख ९४ हजार २६५ इतकी रक्कम होती; मात्र ती १२.४० टक्के इतक्या वाढीव दराने म्हणजेच ४८ कोटी ४५ लाख ४१ हजार इतकी झाली आहे.

विरार येथे उभारण्यात येणाऱ्या क्रीडासंकुलाची रखडपट्टी तसेच त्यामुळे वाढलेल्या खर्चाची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कारवाईची मागणी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्याकडे केली आहे.

- मनोज पाटील, वसई विरार जिल्हा उपाध्यक्ष, भाजप

Scanned with CamScanner


सकाळ ५·५T·१.

# ज्येष्ठांना नाकाद्वारे मिळणार बूस्टर

## मिरा-भाईंदरमध्ये लवकरच कोरोना लसीकरण सुरू

भाईंदर, ता. २७ (बातमीदार) : राज्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदरमधील वरिष्ठ नागरिकांना पहिल्यांदाच इन्कोव्हॅक या नाकाद्वारे घ्यायच्या कोविड लशीचा बूस्टर डोस देण्यात येणार आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून ही लस सर्व लसीकरण केंद्रांवर लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

कोविशिल्ड किंवा कोवॅक्सीन लसीची दुसरी मात्रा घेतल्यानंतर सहा महिने पूर्ण झालेले ६० वर्षांवरील लाभार्थी या बूस्टर डोसकरिता पात्र असणार आहेत. या लसीचे डोस मिरा-भाईंदर शहरातील सर्व कोविड लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. केंद्र शासनामार्फत या लाभार्थ्यांच्या नोंदणीसाठीची कोविनवरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे.



६० वर्षांवरील बूस्टर डोसकरिता पात्र असलेल्या लाभार्थ्यांना हा डोस घेण्यासाठी दुसरा डोस घेतल्याचा पुरावा तसेच ओळखपत्रे कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी सादर करणे आवश्यक आहे.

### इन्कोव्हॅक लशीचे दीडशे डोस उपलब्ध

सध्या महापालिकेकडे इन्कोव्हॅक या लशीचे दीडशे डोस उपलब्ध झाले आहेत. आतापर्यंत एकंदर ९० हजार ७५२ वरिष्ठ नागरिकांनी लशीचा पहिला डोस व ८४ हजार ७१९ वरिष्ठ नागरिकांनी दूसरा डोस घेतला आहे, परंतु बूस्टर डोस घेण्यासाठी मात्र वरिष्ठ नागरिकांनी फारशी उत्सुकता दर्शवलेली नाही. ३६ हजार ३९१ एवढ्याच वरिष्ठ नागरिकांनी बूस्टर डोस घेतला आहे.

कोविशिल्ड किंवा कोवॅक्सीन लसीचा दुसरा डोस घेऊन सहा महिने पूर्ण झालेल्या व अद्यापही बूस्टर डोसपासून वंचित असलेल्या ६० वर्षांवरील नागरिकांनी शासकीय कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी जाऊन बूस्टर डोस घ्यावा व स्वतःला कोविड संरक्षित करून घ्यावे.

- दिलीप ढोले, आयुक्त, मिरा-भाईंदर महापालिका

# अवकाळी पावसामुळे ११ कोटींचे नुकसान

## बागायतीवर संकट; पंचनामे पूर्ण, नुकसानभरपाई देण्याची सरकारकडे मागणी

वसई, ता. २७ (बातमीदार) : पालघर जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीसह फळ बागांना मोठा फटका बसला आहे. बसला डहाणू, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा या पाच तालुक्यात अस्मानी संकटाने शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. तर दुसरीकडे जिल्हा कृषी विभागाने पंचनामे पूर्ण करून शासनाकडे ११ कोटी ५० लाख ७९ हजार रुपये इतकी नुकसानीची मागणी केली आहे.



बाधित क्षेत्र हेक्टर

**५२८६. ५८**

नुकसान

**११ कोटी ५० लाख ७९ हजार**

### अडीच हजार शेतकरी बाधित

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पंचनामे केले. यात दोन हजार ५०० हून अधिक शेतकरी बाधित झाले आहेत. बाधित क्षेत्र पाहता त्यानुसार ११ कोटीहून अधिक नुकसानीची मागणी करण्यात आली आहे.

### भरपाईची प्रतीक्षा

पालघर जिल्ह्यात मार्च महिन्यात अवकाळी पाऊस झाला, त्यामुळे बागायतीचे नुकसान झाले. यात प्रामुख्याने काजू आणि आंब्याचे प्रचंड नुकसान झाले. तसेच भाजीपाला लागवडीवरही परिणाम झाला. त्यामुळे नुकसान भरपाई कधी मिळणार याची प्रतीक्षा शेतकरी करत आहेत.

पालघर जिल्ह्यात बागायती मोठ्या प्रमाणात आहे. येथील शेतमाल हा मुंबई, ठाणे यासह आजूबाजूच्या परिसरात तसेच राज्याबाहेर देखील निर्यात केला जातो. अनेक कुटूंब शेती बागायतीवर अवलंबून आहेत. या उत्पादनातून मिळणाऱ्या पैशातून खर्च भागवला जातो. परंतु वातावरणात झालेला बदल, अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांना लागवडीसाठी केलेला खर्चही वाया गेला आहे. त्यामुळे महागाईत संसाराचा गाढा कसा हाकणार हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. त्यामुळे शासनाकडून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती.

१९ मार्चपर्यंत झालेल्या अवकाळी पावसात पहिल्या टप्प्यात चार तालुक्यात बागायतीवर परिणाम झाला. कृषी विभागाने केलेल्या पंचनाम्यांतून सात कोटींचे नुकसान झाल्याचे समोर आले होते. पण २० मार्च रोजी झालेल्या पावसामुळे डहाणू, जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा तालुक्यांना मोठा फटका बसला. त्यामुळे नुकसानीचा आकडा हा सातवरून ११ कोटींच्या घरात पोहोचला आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी ५.५.१.

# विकासकाला ईडीची बनावट नोटीस दिल्याप्रकरणी आरोपीला अटक

## अन्य दोघांचा पोलिसांकडून शोध सुरू

मीरा रोड : भाईंदरमधील विकासक आणि त्याच्या भागीदारांना अंमलबजावणी संचालनालयाची (ईडी) बनावट नोटीस दाखवून खंडणी उकळण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या प्रकरणातील सहभागी तीन आरोपींपैकी राजू शहाला काशिमीरा पोलिसांनी अटक केली. शहा याला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

भाईंदरमधील सालासर कंपनीचे विकासक आनंद अग्रवाल यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात २२ जानेवारी २०२३ रोजी गौतम अग्रवाल, मितेश शहा आणि राजू शहा यांच्याविरोधात लेखी तक्रार दाखल केली होती. त्यामध्ये मितेश शहा नावाच्या व्यक्तीने त्याला अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) त्याच्या नावाने पाठवलेली नोटीस दाखवली. ईडी चौकशीची खोटी नोटीस बनवून ती खरी आहे, असे भासवत ईडी चौकशीची सेटलमेंट करण्यासाठी पाच लाख रुपये मितेश शहा याने मागितले व गौतम अग्रवाल याचे कोणतेही पैसे बाकी नसताना गौतम अग्रवाल यास साडेसहा कोटी रुपये परत करा, असे सांगून खंडणी मागितली होती. ती नोटीस खोटी असल्याची खात्री करून आनंद अग्रवाल यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात २२ जानेवारी २०२३ रोजी गौतम अग्रवाल, राजू शहा आणि मितेश शहा यांच्याविरुद्ध लेखी तक्रार दाखल केली. मात्र हे संपूर्ण प्रकरण काशिमीरा परिसरातील जमिनीशी संबंधित असल्याने पोलिसांनी पुढील तपासासाठी ते काशिमीरा पोलीस ठाण्यात वर्ग केले होते.



नंतर काशिमिरा पोलिसांनी तपास करून १० मार्च २०२३ रोजी त्या तिघांविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी गुन्ह्याचा तपास करून दिल्लीत लेखापाल असलेल्या कृष्णकुमार कौशिक याने ईडीचे खोटे समन्स बनवून दिल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याला अटक केली. तेव्हापासून गौतम अग्रवाल, राजू शहा आणि मितेश शहा हे फरार आहेत. राजू शहा याने ठाणे न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. तो न्यायालयाने फेटाळून लावला आहे. पोलिसांकडून त्यांचा शोध घेणे सुरू असताना बुधवारी पहाटे फरार असलेल्या तिघांपैकी राजू शहा यास अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम यांनी सांगितले. पुढील तपास सुरू असून, लवकरच अन्य दोन आरोपींना ताब्यात घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सकाळ ५.५.१.

# अभिनव शेतकरी संस्थेचा वाद सर्वोच्च न्यायालयात

भाईंदर, ता. २७ (बातमीदार) : भाईंदर पुर्व येथील अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेच्या निवडणुकीत वादग्रस्त ९९ सदस्यांचे मतदान वेगळे ठेवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या सदस्यांच्या सदस्यत्वाची पडताळणी होईपर्यंत ती मते विचारात घेण्यात येऊ नयेत, असे न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या संस्थेची निवडणूक सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे.

अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाची स्थापना १९७२ मध्ये झाली. २०११ पर्यंत या संस्थेत ४८९ इतके सदस्य होते. त्यातील १५२ सदस्य आता हयात नाहीत. २०११ नंतर मात्र या सदस्यसंख्येत ९९ ने वाढ झाली. परंतू या नव्या ९९ सदस्यांवर संस्थेच्या मुळ सदस्यांपैकी काहीजणांनी आक्षेप घेतला आहे. त्यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित आहे. दरम्यानच्या काळात संस्थेची निवडणुक जाहीर झाली असून ती शनिवारी २९ एप्रिलला होणार आहे. त्यामुळे आक्षेप घेणाऱ्या सदस्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने आक्षेप घेण्यात आलेल्या ९९ सदस्यांना मतदानास परवानगी दिली. पण या सदस्यांच्या मतदानाची मोजणी करुन ती स्वतंत्र ठेवावित. आक्षेप घेण्यात आलेल्या सदस्यांच्या सदस्यत्वाची पडताळणी निवृत न्यायधिशाकडून करुन घ्यावी. या पडताळणीनंतरच या सदस्यांची मते विचारात घेण्यात यावित असे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात नमूद करण्यात आले आहे.

अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ ही गोडदेव, नवगर, खारीगाव तसेच राई, मूर्धा व मोर्वा या गावातील आगरी समाजाची संस्था आहे.

# अवघ्या बारा तासात चोरट्याला अटक

भाईंदर, ता. २७ (बातमीदार) : मिरा रोड येथील काँग्रेसच्या माजी नगरसेवकाच्या घरी चोरी करून लाखो रुपयांची रोख रक्कम नेणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अवघ्या बारा तासांत गजाआड केले आहे. माजी नगरसेवक राजीव मेहरा यांच्या घरी ही चोरी झाली होती. आरोपी मेहरा यांचा सहकारी असल्याचे सांगितले जात आहे.

काँग्रेसचे माजी नगरसेवक राजीव मेहरा हे काही कामानिमित्त घर बंद करून बाहेर गेले होते. ही संधी साधून चोरट्याने त्यांच्या घराच्या गच्चीचा दरवाजा कापून आतमध्ये प्रवेश केला. शयनगृहातील कपाटाचा दरवाजा कापून लॉकरमध्ये ठेवलेली ७० लाखांची रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ७० लाख १२ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. मेहरा यांनी याप्रकरणी मिरा रोड पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. या गुन्ह्याचा काशीमिरा येथील गुन्हे शाखेनेदेखील समांतर तपास सुरू केला होता. पोलिस निरीक्षक अविराज कुराडे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अवघ्या बारा तासांत आरोपीला ताब्यात घेतले.

Scanned with CamScanner